**पंतप्रधान मोदी यांची राष्ट्राध्यक्ष पुतीन यांच्या समवेत चर्चा**

08 ऑगस्ट 2025

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी आणि रशियाचे महामहिम राष्ट्राध्यक्ष श्री. व्लादिमीर पुतीन यांमध्ये दूरध्वनी द्वारे चर्चा पार पडली.

यूक्रेन बाबतच्या अलीकडील घडामोडी बाबत राष्ट्राध्यक्ष पुतीन यांनी पंतप्रधानांना अवगत केले.

राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्या तपशीलवार माहितीसाठी आभार मानताना पंतप्रधानांनी संघर्ष निराकरणासाठी भारताच्या शांततापूर्ण मार्गाच्या स्थायी भूमिकेचा पुनरुच्चार केला.

उभय नेत्यांनी द्विपक्षीय कार्यक्रमातील प्रगतीचा आढावा घेतला. भारत आणि रशिया दरम्यान विशेष आणि विशेषाधिकारप्राप्त धोरणात्मक भागीदारी अधिक बळकट करण्यासाठी  वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला.

पंतप्रधानांनी चालू वर्षात प्रस्तावित असलेल्या 23 व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी राष्ट्राध्यक्ष पुतिन यांना आमंत्रित केले.

**नवी दिल्ली**

08 ऑगस्ट 2025